# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. १०८-११०

(विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीतील बैठका)

**दिनांक : ५ डिसेंबर ते १७ डिसेंबर २०१६**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| १०८ | ०४ डिसेंबर | रामगिरी निवासस्थान, नागपूर |
| १०९ | ०८ डिसेंबर | विधानभवन, नागपूर |
| ११० | १५ डिसेंबर | विधानभवन, नागपूर |

४ डिसेंबर २०१६
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियमात सुधारणेस मान्यता

महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम-२०१५ मध्ये सुधारणा करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच सुधारणा विधेयक विधिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

राज्यातील विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी १५ मे २०१५ पासून महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम-२०१५ अंमलात आला आहे. या अधिनियमाच्या विविध तरतुदींमध्ये अधिक स्पष्टता आणणे आवश्यक असल्यामुळे अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

कलम २ अंतर्गत सामाजिक प्रवेश परीक्षा, अधिवास, भारतीय वंशाच्या व्यक्ती व खाजगी अभिमत विद्यापीठे यांच्या नवीन व्याख्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच कलम ३ (२) अंतर्गत प्रवेश पात्रतेमध्ये सुधारणा, कलम ४ अंतर्गत प्रवेश पद्धतीमध्ये सुधारणा, कलम ६ अंतर्गत विविध संवर्गासाठीच्या (राखीव, अखिल भारतीय, अल्पसंख्याक) जागा वाटपाबाबत अधिक स्पष्टता आणण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कलम ७ अंतर्गत वैद्यकीय शिक्षण व आयुष यांचे संचालक यांचा समावेश प्रवेश नियामक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून करणे आणि राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त यांना प्राधिकरणाचे सचिव ऐवजी सदस्य सचिव करणे अशी सुधारणा करण्यात येणार आहे.

या अधिनियमामध्ये कलम ९ अंतर्गत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अधिकार व कर्तव्ये यात सुधारणा करणे, कलम १० अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची अधिकार कक्षा स्पष्ट करणे, कलम ११ अंतर्गत वैद्यकीय शिक्षण व आयुष यांचे संचालक यांचा समावेश शुल्क नियामक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून करणे आणि शुल्क नियामक प्राधिकरणाचे आयुक्त यांना सचिव ऐवजी सदस्य सचिव करणे अशी सुधारणा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कलम १३ अंतर्गत शुल्क नियामक प्राधिकरणाच्या अधिकार व कर्तव्ये यामध्ये सुधारणा करणे, कलम २० अंतर्गत शैक्षणिक संस्थेने नियमातील तरतुदींचा भंग केल्यास दंड आकारण्याची तरतूद करणे आदी सुधारणांना मंजुरी देण्यात आली आहे.

----०----

८ डिसेंबर २०१६
नगर विकास विभाग

पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१

**पिंपरी चिंचवड-स्वारगेट आणि वनाझ-रामवाडी मार्गिकांच्या सुधारित प्रस्तावास मंजुरी**

पुणे महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्रमांक-१ (पिंपरी चिंचवड ते स्वारगेट) आणि मार्गिका क्रमांक-२ (वनाझ ते रामवाडी) या दोन्ही मार्गिकांच्या सुधारित प्रस्तावास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

यापूर्वी २०१३ मध्ये या प्रकल्पास मान्यता देण्यात आली होती. तसेच "पिंपरी ते निगडी" आणि "स्वारगेट ते कात्रज" अशा एकूण १५ किलोमीटरच्या वाढीव मार्गिकेस देखील तत्वत: मान्यता मिळाली होती. मात्र, या प्रकल्पाच्या आखणीबाबत आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने शासनाने समिती स्थापन केली. समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रकल्पाची सुसाध्यता कायम ठेवून सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सुधारित प्रस्तावानुसार पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्रमांक-१ ही पिंपरी चिंचवड ते स्वारगेट (लांबी १६.५८९ किमी) आणि मार्गिका क्रमांक-२ वनाझ ते रामवाडी (लांबी १४.६६५ किमी) या ११,४२० कोटी किंमतीच्या उन्नत व अंशत: भूयारी मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे. तसेच या प्रकल्पाच्या खर्चामध्ये कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास त्याचे दायित्व राज्य शासनावर न येता तो भार पूर्णत: विशेष हेतू वहन (Special Purpose Vehicle) कंपनीचा राहणार आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांकडून घेण्यात येणारे कर्ज व त्याचे व्याज, राज्य शासनाचा समभाग, केंद्र शासनाचे कर, राज्यस्तरीय किंवा स्थानिक कर यावरील खर्च, राज्य शासनाचे दुय्यम कर्जसहाय्य यांची परतफेड करण्याची जबाबदारीदेखील विशेष हेतू वहन कंपनीकडे सोपविण्यात आली आहे.

राज्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकच राज्यस्तरीय विशेष हेतू वहन कंपनी ठेवण्यात येणार आहे. यामुळे नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनमध्ये परिवर्तन करण्यास मान्यता देण्यात आली असून पुणे महानगर मेट्रो रेल्वे अंतर्गत या दोन्ही मार्गिकांचे प्रकल्पदेखील महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे सोपविण्यात आले आहेत. महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीस प्रकल्प अंमलबजावणी संदर्भात दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या धर्तीवर अधिकार प्रदान करण्यासदेखील मान्यता देण्यात आली आहे.

----o----

८ डिसेंबर २०१६

विधि व न्याय विभाग

**कालबाह्य ३१२ अधिनियमांचे**
**निरसन करण्यास मान्यता**

महाराष्ट्र विधि आयोगाने शिफारस केलेल्या व प्रशासकीय विभागांनी संमती दिलेले ३२ अधिनियम आणि २८० विनियोजन अधिनियम असे एकूण ३१२ कालबाह्य अधिनियमांचे निरसन करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून वेळोवेळी करण्यात आलेले तथापि, कालबाह्य झालेले २००९ पर्यंतचे महाराष्ट्र विनियोजन अधिनियम हे विशिष्ट कालावधीसाठीच करण्यात आलेले असल्याने ते निरसित करणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र राज्य विधि आयोगाने महाराष्ट्र संहिता खंड १ ते ९ मधील अधिनियम तपासून कालबाह्य झालेल्या अधिनियमांचे निरसन करण्याबाबतचे १० अहवाल शासनास सादर केले आहेत. त्यानुसार प्रत्येक अधिनियमाच्या नावाखाली संबंधित अधिनियम निरसित करावयाचा किंवा ठेवायचा याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय विधि आयोगाने नोंदविले होते. त्यानुसार प्रशासकीय विभागांनी संमती दिलेल्या एकूण ३१२ अधिनियमांचे निरसन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

----०----

८ डिसेंबर २०१६

सामान्य प्रशासन विभाग

<u>सहार येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावात बदल</u>

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण**

मुंबईतील सहार येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वामुळे केवळ महाराष्ट्रातील जनतेमध्येच नव्हे तर सर्व भारतीयांच्या मनात त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. महाराजांना द्यावयाच्या सन्मानाचे आणि आदराचे द्योतक म्हणून हा बदल करण्यात आला आहे. विमानतळाच्या नावामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा होणारा एकेरी उल्लेख टाळण्यासाठी विमानतळाच्या नावात बदल करण्यात यावा, अशी मागणी वेळोवेळी करण्यात आली होती. कल्याणकर्ता राजा व आदर्श शासनकर्ता असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने विमानतळाचा उल्लेख करताना महाराज हा आदरार्थी शब्द येणे त्यामुळेच आवश्यक होते. विमानतळ नामांतराची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने मंत्रिमंडळ आणि दोन्ही सभागृहांच्या मान्यतेने हा प्रस्ताव केंद्र शासनाच्या नागरी विमान मंत्रालयाकडे सादर करण्यात येणार आहे.

----०----

१५ डिसेंबर २०१६
नगर विकास विभाग

## मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत तिसऱ्या टप्प्यासाठी १०९४८ कोटी निधी

मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एम.यू.टी.पी.) अंतर्गत तिसऱ्या टप्प्यासाठी १० हजार ९४८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने "मुंबई रेल्वे विकास महामंडळ" या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत व जागतिक बँकेच्या सहाय्याने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१ आणि टप्पा-२ अंतर्गत कामांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या दोन्ही टप्प्यांमध्ये रेल्वे घटकावर विशेष भर देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण करण्यात आली आहेत तर दुसऱ्या टप्प्यातील सीएसटी-कुर्ला दरम्यान ५ वा आणि ६ वा मार्ग टाकणे व बोरीवली-मुंबई सेंट्रल दरम्यान ६ वा मार्ग टाकणे ही कामे वगळता इतर सर्व कामे जवळजवळ पूर्ण झाली आहेत.

महामंडळामार्फत प्रस्तावित तिसऱ्या टप्प्यातील १० हजार ९४८ कोटी खर्चाची कामे भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत ५०:५० अशा आर्थिक सहभागातून राबविण्यास राज्य शासनाकडून आज तत्वत: मान्यता देण्यात आली. या कामांमध्ये विरार- डहाणू दरम्यान रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण करणे (तिसरी-चौथी रेल्वे मार्गिका टाकणे), कर्जत-पनवेल दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे सेवेसाठी मार्गिका टाकणे (रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण करणे), ऐरोली-कळवा दरम्यान उन्नत रेल्वे मार्ग बांधणे, नवीन रेल्वे गाड्या खरेदी करणे (५६५ कोचेस), मध्य व पश्चिम रेल्वे मार्गाच्या मध्य विभागात ट्रेस पास कंट्रोल (रुळ पार करता येऊ नये म्हणून संरक्षक भिंत बांधणे) तसेच तांत्रिक सहाय्य या कामांचा समावेश आहे.

पनवेल ते कर्जत या रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाचा फायदा सिडको परिसरास देखील होणार असल्याने या प्रकल्पात राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्याचा आर्थिक सहभाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सिडको यांनी प्रत्येकी ६९५.७५ कोटी एवढा द्यावा, असे निर्देश देण्यात येणार आहेत. तसेच या प्रकल्पाव्यतिरिक्त तिसऱ्या टप्प्यातील अन्य प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील जनतेस फायदेशीर असल्याने या प्रकल्पातील राज्य शासनाचा ५० टक्के म्हणजे ४०८२.५० कोटी हिस्सा एमएमएआरडीए या संस्थेने उचलण्याचेही निर्देश देण्यात येणार आहेत. एमएमआरडीए आणि सिडको यांनी द्यावयाच्या सहभागाविषयी संबंधित संस्थांशी विचारविनिमय करून आवश्यकता असल्यास त्यात बदल करण्याचे अधिकार शासनाला देण्यासही या बैठकीत मान्य करण्यात आले.

----०----

१५ डिसेंबर २०१६
संसदीय कार्य विभाग

**विधानमंडळाच्या आजी-माजी सदस्यांच्या मागण्यांबाबत**
**अभ्यासासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान व माजी सदस्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करुन आवश्यक प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर निर्णयासाठी सादर करण्याच्या उद्देशाने वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

आजी-माजी विधानमंडळ सदस्यांकडून प्राप्त होणाऱ्या विविध मागण्यांबाबतच्या प्रस्तावांची योग्यायोग्यता तपासणे, मागण्या उचित आहेत किंवा कसे, त्या मान्य करण्याजोग्या आहेत का, याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यापूर्वी अशा प्रस्तावांची छाननी करुन व त्यांचा सखोल अभ्यास करुन त्यापैकी कोणते प्रस्ताव स्विकारुन मंत्रिमंडळासमोर विचारार्थ सादर करणे संयुक्तिक होईल, याबाबत ही उपसमिती निर्णय घेणार आहे.

----०----

१५ डिसेंबर २०१६
संसदीय कार्य विभाग

<u>हिवाळी अधिवेशन १७ डिसेंबरला संस्थगित</u>

**विधानमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन**
**६ मार्च २०१७ रोजी मुंबईत होणार**

विधानमंडळाचे सध्या सुरू असलेले हिवाळी अधिवेशन शनिवार दि. १७ डिसेंबर २०१६ रोजी संस्थगित करण्यासह आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि. ६ मार्च २०१७ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

----०----

१५ डिसेंबर २०१६

वैद्यकीय शिक्षण विभाग

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवेची पदे एमपीएससीच्या कार्यकक्षेतून कायमस्वरुपी वगळण्याचा निर्णय

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाची प्राध्यापक (गट-अ) व सहयोगी प्राध्यापक (गट-अ) ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कार्यकक्षेतून कायमस्वरुपी वगळण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील अध्यापकीय पदांची कमतरता, रुग्णहित आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास या बाबींचा विचार करता अध्यापकीय पदे जलद गतीने भरणे आवश्यक आहे. मात्र, सर्व विभागाकडील पदभरतीची जबाबदारी एमपीएससीकडे असल्यामुळे पदभरती प्रक्रियेस विलंब होऊन या विभागास उशिराने पदे प्राप्त होतात. त्यामुळे अप्पर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव यांच्या अध्यक्षतेखालील निवड मंडळामार्फत पदभरती करण्याच्या दृष्टीने सध्या अस्तित्वात असलेले सेवाप्रवेश नियम आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचार विनिमयातून सूट) नियम १९६५ चे परिशिष्ट यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत.

----०----

१५ डिसेंबर २०१६

वैद्यकीय शिक्षण विभाग

## स्वच्छ मुख अभियान राबविण्यास मान्यता

मुख स्वच्छतेबाबत प्रबोधन होऊन जागृती होण्यासाठी राज्यात स्वच्छ मुख अभियान राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अभियानांतर्गत १ जानेवारी २०१७ पासून राज्यभरात प्रचार मोहिम राबविण्यात येणार असून २३ जानेवारी २०१७ रोजी उद्घाटन होणार आहे.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी महोत्सवाचे नियोजन करण्यात येणार असून त्यासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका या स्तरावर समित्या स्थापन करण्यात येणार आहेत.

-----०-----

१५ डिसेंबर २०१६
परिवहन विभाग

## रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी कंपनीची स्थापना

राज्यातील रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांच्या संयुक्त भागीदारीतून विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) म्हणून महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या कंपनीच्या माध्यमातून राज्यातील रेल्वे प्रकल्पांना गती देण्यात येणार असून रेल्वे प्रकल्पांची निश्चिती, व्यवहार्यता तपासणे, विकास, अंमलबजावणी, प्रकल्प क्षमतेत वाढ, प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करणे, भूसंपादन झाल्यानंतर प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन त्वरेने करणे इत्यादी बाबींबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालय यांच्यात संयुक्त उपक्रम करार करण्यास, कंपनीची नोंदणी करण्याकरिता भागधारक करारनामा, संघटनेचा लेखच्या प्रारुपास मान्यता तसेच प्रारंभिक भागभांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून सन २०१७-१८ मध्ये ५० कोटी उपलब्ध करून देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

-----०-----

१५ डिसेंबर २०१६
वस्त्रोद्योग विभाग

## अकोला येथील निळकंठ सहकारी सूतगिरणीस अर्थसहाय्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमकडे शिफारस

कापूस उत्पादक प्रदेशामध्ये अधिकाधिक सूतगिरण्या सुरु करण्यासह या भागातील बंद पडलेल्या सूतगिरण्या सुरु करण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आला आहे. अकोला येथील निळकंठ सहकारी सूतगिरणीच्या आधुनिकीकरणासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमचे अर्थसहाय्य मिळण्यासाठी आवश्यक अटी शिथिल करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सूतगिरणी आधुनिकीकरणासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून अर्थसहाय्य करण्यासंदर्भात असलेल्या योजनेनुसार सूतगिरणी ७ वर्षापासून उत्पादनाखाली असली पाहिजे अशी अट आहे. अकोला येथील निळकंठ सहकारी सूतगिरणी ही २००८ पासून बंद असल्याने ही अट पूर्ण करत नाही. मात्र, कापूस उत्पादक क्षेत्रात स्थानिक कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून त्या भागात सूतगिरण्या स्थापण करण्याचे शासनाने धोरण ठरविले आहे. या धोरणांतर्गत निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या. अकोला या सूतगिरणीस आधुनिकीकरणासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होण्यासाठी ७ वर्ष गिरणी सुरु असण्याच्या अटीसह इतर आवश्यक अटी शिथिल करण्यास आणि राष्ट्रीय सहकार विकास निगमकडे अर्थसहाय्य उपलब्धतेसाठी शिफारस करण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----

१५ डिसेंबर २०१६
शालेय शिक्षण विभाग

## शालेय पोषण आहार योजनेसाठी स्वतंत्र कक्ष

शालेय पोषण आहार योजनेच्या सनियंत्रणासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावर स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासोबतच या कक्षासाठी ४१ नवीन पदांची निर्मिती करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

या कक्षासाठी प्रस्तावित ४१ पदांपैकी १७ पदे ही प्रतिनियुक्तीने भरावयाची असून उर्वरित २४ पदे ही कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत. कक्षासाठीचा संपूर्ण खर्च केंद्र शासनाच्या निधीतून भागविण्यात येणार आहे. प्रतिनियुक्तीने पदे भरल्यानंतर या पदांचे मानधन, नियमानुसार देय असलेले भत्ते व इतर अनुषंगिक लाभ शालेय पोषण आहार योजनेसाठी उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात येणार आहेत. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून व्यवस्थापन, सनियंत्रण व मूल्यमापन (MME) यासाठी जोपर्यंत निधी प्राप्त होईल तोपर्यंत हा स्वतंत्र कक्ष अस्तित्वात राहील.

-----o-----

१५ डिसेंबर २०१६
संसदीय कार्य विभाग

**पीठासीन अधिकारी, मंत्री, विरोधी पक्षनेते, राज्यमंत्री यांच्यासह विधानमंडळ सदस्यांच्या वेतन व भत्ते अधिनियमांत सुधारणा करण्यास मंजुरी**

महाराष्ट्र विधानमंडळाचे पीठासीन अधिकारी, मंत्री, विरोधी पक्षनेते, राज्यमंत्री आणि सदस्य यांचे वेतन आणि भत्ते अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्याचे वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार, संसदीय कार्यमंत्री गिरीश बापट आणि पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्या मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानमंडळाचे पीठासीन अधिकारी, मंत्री, विरोधी पक्षनेते, राज्यमंत्री आणि विधानमंडळ सदस्य यांचे वेतन आणि भत्ते अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी ५ ऑगस्ट २०१६ रोजी विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांनी विधेयक क्रमांक ४१ संमत केले. मा. राज्यपाल महोदयांनी संमती दिल्यानंतर महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ म्हणून ते शासन राजपत्रामध्ये दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे.

तथापि, मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार या मान्यवरांच्या वेतन आणि भत्ते यामध्ये सुधारणा करताना काही सुधारणा अनावधानाने राहून गेल्या. या राहिलेल्या सुधारणा समाविष्ट करुन वेतन व भत्ते आणि वाहन भत्ता यामध्ये अधिनियम क्रमांक ३२ नुसार सुयोग्यता राखता यावी, यासाठी वेतन आणि भत्ते अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी मिळाली आहे. या सुधारणादेखील २४ ऑगस्ट २०१६ पासून लागू राहणार आहेत.

----०----